महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

जनसंपर्क विभाग : महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
'प्रकाशगड', प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, ४ था मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१
संकेतस्थळ : www.mahadiscom.in दूरध्वनी : ०२२-६९८५२२०० ईमेल-prodiscomm@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३४३५, १८००-२१२-३४३५, १९१२, १९१२०

प्रेसनोट - दि. 10 सप्टेंबर 2026

'एआय' मोड्यूलने महावितरणचा वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक; ३ महिन्यांत २८ हजार वीजचोऱ्यांचा पर्दाफाश

मुंबई, दि. १० सप्टेंबर २०२६: वीजचोरीविरोधी तडाखा देण्याच्या मोहिमेमध्ये महावितरणने आता 'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरांवर सर्जिकल स्ट्राईक सुरु केला आहे. तब्बल १९० भरारी पथकांकडून वीजजोडण्यांची तपासणी आणि 'एआय' मोड्यूलच्या सूक्ष्म विश्लेषणातून गेल्या तीन महिन्यात ६६ कोटी २८ लाख रुपयांच्या २७ हजार ९६४ वीजचोऱ्यांचा पर्दाफाश झाला आहे. आतापर्यंत वीजचोरी व तडजोड शुल्काची रक्कम न भरलेल्या २८९ प्रकरणांमध्ये फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

वीजचोरीविरोधी पारंपरिक तपासणीसोबतच महावितरणने आता हायटेक मोहीम उघडली आहे. यासाठी थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' व 'मशीन लर्निंग'चा वापर करून वीजचोरीचे अचूक भाकित करणारे मोड्यूल तयार केले आहे. वीजग्राहकांचा किंवा परिसरातील वीज वापराचा जुना आलेख, अचानक घटलेली किंवा वाढलेली मागणी, मीटरमधील तांत्रिक फेरफार आणि इतर ५० हून अधिक तांत्रिक निकषांचे हे मोड्यूल २४ तास सूक्ष्म विश्लेषण करत आहे. ज्या ग्राहकांच्या वीजवापरामध्ये शंकास्पद फरक आढळत आहे त्या ग्राहकांना हे 'एआय'चे मोड्यूल 'हाय-रिस्क' श्रेणीत टाकत आहे. त्यामुळे कोणत्याही तपासणीशिवाय थेट चोरी होणाऱ्या ठिकाणाची अचूक माहिती या मोड्यूलद्वारे उपलब्ध होत आहे.

'एआय'च्या 'सुपर इंटेलिजन्स'चा वापर करून वीजचोरीच्या ठिकाणांची तपासणी करण्यासाठी महावितरणचे राज्यभरात १९० हून अधिक विशेष भरारी पथके कार्यरत आहेत. वीजचोरीविरोधी धडक कारवाईत कुठेही हयगय होऊ नये यासाठी वीजजोडण्यांच्या तपासणीपासून ते वीजबिलांच्या आकारणीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया 'थेफ्ट ट्रॅकिंग ॲण्ड मॉनिटरिंग सिस्टीम'द्वारे पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. यासाठी एक स्वतंत्र मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. वीजचोरीचे ठिकाण ते तपासणीचे लाईव्ह फोटो, डिजिटल पंचनामा, जागेवरच वीजपुरवठा खंडित करणे आणि दंडात्मक बिलांची वसूली करेपर्यंतची सर्व माहिती या ॲपमध्ये रिअल-टाईम अपडेट केली जात आहे. त्यामुळे कारवाईत अत्यंत पारदर्शकता आणि वेग आला आहे.

गेल्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यांत महावितरण अंतर्गत संवसु विभाग आणि सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या नियमित व विशेष पथकांनी छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागात ५ हजार ८३, कोकण- ११ हजार ८३, नागपूर- ५ हजार ९४९ आणि पुणे प्रादेशिक विभागात ५ हजार ८४९ अशा एकूण २७ हजार ९६४ वीजचोऱ्या उघड केल्या आहेत. त्यातील २४ हजार ५०८ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून ६६ कोटी २८ लाख रुपयांची वीजचोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत वीजचोरीच्या बिलांपोटी १० हजार ८१० प्रकरणांत २९ कोटी ८५ लाख रुपयांचा भरणा करण्यात आला आहे. वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा तडजोड शुल्कासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध

फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. आतापर्यंत २८९ प्रकरणांत कलम १३५ नुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.



श्री. लोकेश चंद्र (मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण) - 'येत्या तीन वर्षांत महावितरणची तांत्रिक व वाणिज्यिक हानी १० टक्क्यांपेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी वीजबिलांच्या थकबाकी वसूलीला प्राधान्य देत विजचोरीविरुद्ध धडक मोहीम सुरु करण्यात आली आहे. वीजचोरीचे प्रकार उघड करण्यासाठी 'एआय' मॉड्यूल विकसित करण्यात आले असून त्याद्वारे वीजचोरीविरुद्धची धडक कारवाई आणखी तीव्र करण्यात आली आहे.'

MSEDCL Strikes Hard on Power Thieves with AI Module; Over 28,000 Electricity Theft Cases Exposed in 3 Months

Mumbai, September 10, 2026: In a massive crackdown on power theft across Maharashtra, Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MSEDCL) has launched an aggressive drive leveraging Artificial Intelligence (AI) 'Super Intelligence'. Combining state-wide physical inspections by 190 flying squads with AI-driven predictive analysis, MSEDCL exposed 27,964 instances of power theft worth ₹66.28 crore over the past three months. Criminal cases have already been registered in 289 instances where offenders failed to pay the assessed electricity charges and compounding fees.

Moving beyond traditional inspection methods, MSEDCL has adopted a high-tech strategy by developing a dedicated AI and Machine Learning (ML) module to accurately predict electricity theft. This advanced module continuously analyzes over 50 technical criteria 24/7, including historical consumption patterns, sudden spikes or drops in demand, and meter tampering anomalies. Consumers exhibiting suspicious consumption patterns are automatically flagged under a 'high-risk' category, providing field teams with precise target locations without requiring prior manual surveys.

To execute ground-level actions based on AI intelligence, MSEDCL has deployed over 190 specialized flying squads across the state. To maintain absolute transparency and eliminate negligence, the entire process—from initial inspection to penalty billing—has been digitized using the 'Theft Tracking and Monitoring System' (TTMS) mobile application. Inspection

details, live photographs, digital *panchnamas*, immediate disconnection of power supply, and penalty recovery are updated in real-time on the app.

During the three-month period from June to August, joint operations by the O&M and Security & Enforcement divisions exposed power thefts across all major regions: Konkan Region (11,083 cases), Pune Region (5,849 cases), Nagpur Region (5,949 cases), and Chhatrapati Sambhajinagar Region (5,083 cases). Out of the total 27,964 cases detected, formal assessment bills amounting to ₹66.28 crore were issued for 24,508 verified theft cases. So far, MSEDCL has recovered ₹29.85 crore from 10,810 settled cases. Strict legal action is being initiated against those failing to clear dues within the stipulated period, with 289 criminal cases already registered under Section 135 of the Electricity Act. Offenses related to electricity theft carry penalties and imprisonment for up to three years.



Mr. Lokesh Chandra (ACS to CM and Chairman & Managing Director, MSEDCL, stated, "Our target is to reduce MSEDCL's Aggregate Technical and Commercial (AT&C) losses to below 10 percent over the next three years. Prioritizing the recovery of outstanding dues, an aggressive campaign against power theft is underway. The newly developed AI module has greatly intensified our precision and enforcement capabilities against electricity theft across the state."
